8 सप्टेंबर 2018

# शैक्षणिक सहल अहवाल – 2018-019

## 'कर्नाळा किल्ला'

आमच्या महाविद्यालयाच्या इतिहास विभागाची शैक्षणिक सहल शनिवार दिनांक 8 सप्टेंबर 2018 रोजी 'कर्नाळा किल्ला, कर्नाळा पक्षी अभयारण्य' या ठिकाणी ऐतिहासिक, नैसर्गिक अभ्यास करण्यासाठी गेली होती. या सहलीमध्ये 21 विद्यार्थी, 24 विद्यार्थिनी आणि 5 प्राध्यापक असे एकूण 50 व्यक्ती सहभागी झाले आहेत.

शनिवार दिनांक 8 सप्टेंबर 2018 रोजी पहाटे 1.00 वाजता आम्ही सर्व विद्यार्थी आणि शिक्षक कर्नाळा किल्ला पाहण्यासाठी रवाना झालो. सकाळी 7.00 वाजता आम्ही कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी पोहोचलो.

कर्नाळा किल्ल्याकडे जाताना सर्वात प्रथम आम्ही कर्नाळा किल्ल्याजवळील पक्षी अभयारण्य पाहिले. यामध्ये प्रथम आम्ही कर्नाळा पक्षी अभयारण्यातील माहिती केंद्र या ठिकाणी पोहोचलो तेथे आम्ही सर्वांनी List of Birds spotted at Karnala bird Sanctuary हा बोर्ड पाहिला. त्यावरील माहिती वाचली. यामध्ये एकूण 141 पक्षांची नावे आम्हांला माहिती झाली. ही माहिती वाचून झाल्यानंतर पुढे आम्ही सर्वांनी कर्नाळा पक्षी अभयारण्यातील पक्षी निरीक्षण करण्याची स्थळे यांची माहिती वाचली. यामध्ये प्रामुख्याने स्थान आणि पक्षी यांची माहिती मिळाली.

ॲप्रोच रोड टू रेस्ट हाऊस या स्थानामध्ये बॅबलर पक्षी, बार्बेट (तांबट पक्षी), बुलबुल, कावळा, ड्रॅंगो, ओरीओल या पक्षांची नावे होती. तसेच सुतार पक्षी, थ्रश, मोस्टाका ट्रेल, गरुड, तोरा, खंड्या पक्षी या सर्व पक्ष्यांची माहिती आम्ही घेतली. या अभयारण्याचे क्षेत्रफळ सुमारे 12.154 चौ. कि.मी असून ते पनवेल सह्याद्रि पर्वताच्या उत्तरेकडील पश्चिम पर्वतरांगापैकी एक पर्वत शिखरावर आहे. मुंबई गोवा - राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 वरील हे एकमेव पक्षी अभयारण्य आहे.

डॉ. सलीम अली या सुप्रसिद्ध पक्षीतज्ञाची फार मोठी प्रेरणा या पक्षी अभयारण्याच्या निर्मितीमागे होती. ही प्रेरणा त्यांनी पक्षी निरिक्षणासाठी या अरण्याला ज्या भेटी दिल्या, त्यामधून निर्माण झाली. या अभयारण्यामध्ये 37 प्रजाती हिवाळ्यामध्ये स्थलांतरीत झालेल्या असतात.

Scanned with AnyScanner

शाहीन ससाण्याची जोडी कर्नाळ्याच्या किल्ल्यावर आपले घरटे बांधते. फुलांची खुप विशाल अशी विविधता येथे पहायला मिळते. या पक्षी अभयारण्याविषयी सांगायचे म्हणजे हे जिज्ञासु, पक्षी निरीक्षक निसर्गप्रेमी भटकंतीचे वेड असलेले आणि वन्यजीवन अभ्यासक, संशोधक यांना खूप काम करता येईल असे स्थान आहे. या सर्व घटकांची माहिती आम्हांला मिळाली.

तेथून पुढे गेल्यानंतर आम्ही सावर हा वृक्ष पाहिला. Orange headed Ground Thrush शव कस्तूर या पक्षाचा बोर्ड पाहिला. तेथून पुढे गेल्यानंतर कर्नाळा किल्ल्याकडे प्रवेश असा बोर्ड पाहिला तो पाहिल्यानंतर किल्ल्यावर्ती जाण्याची आमची उत्सुकता आणखी वाढली तेथून पुढे आमचा सर्वांचा Tracking चा प्रवास सुरू झाला. खडकाळ आणि गर्द झाडीतून आम्ही सर्वजन चालू लागलो. येथे Tracking करत असताना आम्हांला विविध प्रकारची झाडे, वेली पहायला मिळाली. येथील निसर्गरम्य वातावरणाचा अनुभव घेता आला. नंतर आम्ही किल्ल्याच्या वाटेवरील खडकातील देवाचे दर्शन घेऊन आम्ही सर्वजण पुढे गेलो. प्रवेशदारातून प्रवेश करून आम्ही सर्वजण किल्ल्याच्या परिसरामध्ये पोहोचलो. खालून अंगठ्यासारखी दिसणारी सुळक्याची भव्यता आम्ही सर्वांनी समोरून पाहिली. हा सर्व निसर्गाचा देखावा आम्ही अनुभवला.

सुमारे बाराशे वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत कर्नाळा किल्ल्याने अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. भोज, शिलाहार, देवगिरीच्या यादव घराण्यांचा सुवर्णकाळ जसा पाहिला तसा यवनी परचक्रांच्या टाचांखाली घोर अंधः कारात सुमारे तीनशे वर्षे पिचत गेलेला हताश महाराष्ट्र ही याने पाहिला. छत्रपती शिवाजी महाराजांचा हिंदवी स्वराज्य स्थापनेचा सोहळा पाहत असताना दीडशे वर्षांनं मरहट्टे भीमथडीच्या तट्टांनीला यमुनेचे पाणी पाजून अटकेपार दौडत जातानाही पाहिले. इंग्रजांच्या भारतावर युनियन जॅक फडकला हे पारतंत्र्यही त्याने समर्थपणे पचविले.

अशी किल्ल्यावरील सर्व ऐतिहासिक माहिती आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. व तेथील निसर्गरम्य वातावरणाचाही अनुभव घेतला.

Scanned with AnyScanner